M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

परिपत्रक

क्र.मुविमं/लेखा/नों.शि.शुल्क 25-26/2339
वाशी,नवी मुंबई ४००७०३
दिनांक ०४/०६/२०२५

विषय:– शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणे बाबत..
संदर्भ:– क्र.रा.मं./लेखा–प्रकाशन/१९३७ पुणे दिनांक ०२/०६/२०२५ रोजीचे पत्र.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

मुंबई विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की,सन २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क राज्य मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या वेबसाईटव्दारे ऑनलाईन पध्दतीने स्विकारणेकरीता नव्याने संगणक प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क नवीन संगणक प्रणालीव्दारे मंडळाकडे सादर केल्याशिवाय माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करता येणार नाहीत.

तरी या कार्यालयाचे आदेश किंवा परिपत्रक आपणास प्राप्त होईपर्यंत तुर्त २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क शाळा व कनिष्ठ महाविदयालय यांनी रोखीने, अथवा चलनाव्दारे भरणा करण्यात येऊ नये.याची नोंद घेण्यात यावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

प्रत माहितीस्तव–
मा.सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,भांबुर्डा,शिवाजीनगर पुणे

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987
*Email * : sschscmumbaiboard@gmail.com * Website *: www.sschscmumbaiboard@gmail.in